रे.मु.न. ३४/२०१५
तातोबा वि. नारायण

## नि. ५ वरील आदेश

१. वादीने दावा मिळकतींवर कुठल्याही त्रयस्थ इसमाचा हितसंबंध निर्माण करु नये असा प्रतिवादींविरुध्द अंतरीम मनाई हुकूमाची मागणी केली आहे.

२. वादीचे थोडक्यात कथन असे की तो दावा मिळकतींचा सहमालक व ताबेदार आहे. पुर्वीपासून सदर जमिनी त्याच्या वडीलांचे म्हणजे काशीराम तात्या पाठारे यांच्या नावे होती व त्यांचे पश्चात सदर जमिनींचा प्रत्यक्ष ताबा त्यांच्या वारसांकडे आला. वादी देखील त्यापेकी एक असल्यामुळे त्याचा देखील त्यावर सामाईक ताबा व वहिवाट मागील ५० वर्षापासून आहे. वादी हे प्रतिवादीचे चुलते आहेत. दरम्यान दावा मिळकतीवर कुळ कायद्यानुसार फक्त प्रतिवादीची नावे लागली. प्रतिवादीला वादीचा दावा मिळकतींवर अधिकार व हक्क असल्याची माहिती असल्यामुळे त्यांनी कधीही वादीस दावा मिळकत सामाईकरित्या कसवणूक करण्यास हरकत घेतली नाही. त्यामुळे तो आजही भात, नाचणी इत्यादी पीक नियमितपणे घेत आहे.

३. प्रतिवादींनी सातबारा मधील दुरुस्ती करुन वादीचे नाव लावण्याचे व त्यास पुढे त्याचा वेगळा हिस्सा देण्याचे अश्वासन दिले. तसे अश्वासन दिल्यावरही ते आता वादीस तशी दुरुस्ती करण्यासाठी कुठलेही सहाय्य करीत नाहीत. उलट प्रतिवादी त्यामध्ये त्रयस्थ इसमांचा हक्क, अधिकार किंवा हितसंबंध निर्माण करण्याचा प्रयत्नात आहेत. म्हणून वादीच्या अधिकार व हक्क सिध्द होईपर्यत व दावा गुणवत्तेच्या आधारे निकाली लागेपर्यत वादातील मिळकती आहे त्या परिस्थितीत कायम ठेवण्यासाठी अंतरीम मनाई हुकूमाची

मागणी केली. वादीने सरतेशेवटी अर्ज मंजूर करण्याची विनंती केली.

४. प्रतिवादी प्रकरणात हजर झाले होते, परंतु विहित मुद्दतीत त्यांनी त्यांची लेखी कैफियत व म्हणणे सादर केले नाही. म्हणून प्रकरण त्यांच्या लेखी कैफियती व म्हणण्याशिवाय पुढे चालविण्यात आले.

५. प्रकरणातील मुद्दे व त्यावरील माझे निष्कर्ष यासह खालील प्रमाणे नोंदवित आहे.

| अ.क्र. | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १ | वादीचा दावा हा प्रथमदर्शणी आहे काय ? | होय |
| २ | अनुकुलतेचा कल वादीच्या बाजूने आहे काय ? | होय |
| ३ | अंतरीम मनाई हुकूम न दिल्यास वादीचे अपरिमीत नुकसान हाईल काय ? | होय |
| ४ | अंतिम आदेश ? | अर्ज मंजूर करण्यात येतो. |

**मुद्या क्र. १ बाबत**

६. वादीने शपथेवर कथन केले की, वादातील मिळकत पूर्वी त्याचे वडील काशीराम पाठारे यांच्या मालकीची व ताबे वहिवाटीतील होती. त्यांचे पश्चात सदर जमिनींचा प्रत्यक्ष ताबा त्यांच्या वारसांकडे आला. वादी देखील त्यापेकी एक असल्यामुळे त्याचा देखील त्यावर सामाईक ताबा व वहिवाट आहे. वादी हे प्रतिवादीचे चुलते आहेत. दरम्यान दावा मिळकतीवर कुळ कायद्यानुसार फक्त प्रतिवादीची नावे लागली. प्रतिवादीला वादीचा दावा

मिळकतींवर अधिकार व हक्क असल्याची माहिती असल्यामुळे त्यांनी कधीही वादीस दावा मिळकत सामाईकरित्या कसवणूक करण्यास हरकत घेतली नाही.

७. प्रकरणात सादर केलेला सातबारा यावरुन सदरील जमिन जरी प्रतिवादीच्या नावे दिसत असली तरी वादीने सर्व प्रतिवादींना दिनांक २४/०८/२०१५ रोजी नोटिस पाठवून वादीने त्याचा दावाजमिनी वरील हक्क व ताब्याबाबत लेखी कळवून त्याला त्याचा हिस्सा कायेशीररित्या वेगळा व नावावर करुन देण्याची मागणी केली सदरील नोटिस प्रतिवादीना प्राप्त झाली, परंतु सदर नोटिसला प्रतिवादीने कुठलेही उत्तर दिले नाही. प्रस्तुत दाव्यामध्ये प्रतिवादी हजर झाले, परंतु त्यांनी लेखी कैफियत अथवा म्हणणे सादर केले नाही. परिणामी, वादीच्या दाव्यास कुठेही आव्हाण मिळालेले नाही. म्हणून प्रस्तुत अर्जात दावा मिळकतींमध्ये त्रयस्थ इसमाचे हितसंबंध निर्माण होवू नये एवढया हद्यीपर्यत अंतरिम मनाई हुकूमाची मागणी सिमीत ठेवली आहे.

८. दाव्याचा निकालापर्यत वादातील मिळकत आहे त्या परिस्थितीत कायम ठेवल्यास त्याचा कोण्याही पक्षांवर पक्षपात होणार नाही. उलट तसे करणे दाव्याचा अंतिम निकालासाठी चांगले ठरेल. म्हणून, वादीचा दावा प्रथमदर्शनी योग्य असल्याचे दिसून येते असे मी ग्राहय धरीत आहे. परिणामी, मुद्या क. १ चे उत्तर मी होकारार्थी देत आहे.

**<u>मुद्या क. २ व ३ बाबत</u>**

९. दावा मिळकत ही आहे त्या परिस्थितीमध्ये कायम ठेवल्यास, सदर गोष्टीचा कोणावरही पक्षपात होणार नाही. शिवाय, दावा मिळकतीत त्रयस्थ इसमाचा हितसंबंध निर्माण झाल्यास दाव्यामध्ये अडचणी निर्माण होण्याची

शक्यता नाकारता येणार नाही. म्हणून अनुकुलतेचा कल वादीच्या बाजूने आहे. त्याचप्रमाणे जर दावा मिळकत विकली गेली किंवा त्यात त्रयस्थ इसमांचा हितसंबधं निर्माण झाले तर निश्चीतच त्याचा परिणाम वादीच्या हक्कावर पडेल व तसे झाल्यास वादीला अपरिमीत नुकसान सोसावे लागेल जे की कुठल्याही पैशाच्या स्वरुपात मोजता येणार नाही. म्हणून मुद्या क्र. २ व ३ चे उत्तर देखील मी होकारार्थी देत आहे.

**मुद्या क्र. ४ बाबत**

१०. वादीने अंतरिम मनाई हुकूमाकरीता आवश्यक असलेल्या तिन्हीही समानतेच्या गोष्टी सिध्द केल्यामुळे, प्रकरणात अंतरीम मनाई हुकूमाचा आदेश पारीत करावा लागेल. म्हणून मुद्या क्र. ४ चे उत्तर मी खालील आदेशान्वये देत आहे.

## – आ दे श –

१. अर्ज (नि.५) खर्चासहीत मंजूर करण्यात येतो.

२. प्रकरणात अंतरिम मनाई हुकूम जारी करुन प्रतिवादींना प्रतिबंधीत करण्यात येते की त्यांनी दाव्याचा निकाल लागेपर्यत कोणत्याही त्रयस्थ इसमाचा अधिकार हक्क किंवा हितसंबंध दावा मिळकतींत निर्माण करुन नये.

ठिकाण : पाली
दिनांक : २१/०९/२०१७

(यु. एल. पाठक)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, पाली
२१/०९/२०१७